## ॥सुविचार

'जीवनात जोखीम घेण्यास कधीही घाबरू नका
जर तुम्ही जिंकलात किंवा हरलात तर तुम्ही शिकाल...' ॥

## केवळ १० मिनिटे टाळ्या वाजवण्याचे आरोग्यदायी फायदे



**हल्ली** आपण बागेत लोकांना जोरजोरात टाळ्या वाजवताना बघत असाल तेव्हा मनात विचारही करत असाल की खरंच टाळ्या वाजवल्याने आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडत असेल का? तर याचं उत्तर आहे होय... नियमित दररोज १० मिनिटे टाळी वाजवली तर हैराण करणारे परिणाम दिसून येतात. तर जाणून घ्या टाळी वाजवण्याचे काय परिणाम आहे ते....

▮याने कॉलेस्ट्रॉल नियंत्रित राहतो.

▮हृदयरोग आणि उच्च रक्तदाबा सारख्या गंभीर आजारांचा धोका दूर होतो.

▮याने चरबी कमी होण्यास मदत मिळते ज्यामुळे वजन कमी होतं.

▮यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते.

▮रक्ताभिसरण चांगले होते.

▮पचनतंत्र सुधारते ज्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या नाहीशी होते.

▮याने फुफ्फुस निरोगी राहण्यास मदत मिळते.

▮मानसिक ताण कमी होतो, मेंदू सक्रिय राहतं ज्यामुळे स्मरणशक्ती वाढते.

▮याने शरीरात हार्मोन्स रिलीज होतात ज्यामुळे चांगली झोप लागते.

▮शरीरात ऑक्सिजनचं प्रमाण वाढतं, ज्यामुळे श्वासासंबंधी आजारावर नियंत्रण राहतं.

## तेलकट त्वचेची काळजी कशी घ्याल !



▮त्वचा तेलकट असल्यास क्लिन्झिंगला पर्याय नाही. क्लिन्झिंगमुळे त्वचेवर साठलेली घाण, मेकअप, मृत त्वचा नाहीसे होऊन रंध्रे मोकळी होतात. या उपायाने ब्लॅकहेड्सची समस्या दूर होते. आठवड्यातून एकदा लाईट स्क्रब केल्याने फायदा होतो.

▮ऑईल फ्री फेसवॉश नियमित वापरल्यास त्वचा तेलकटमुक्त राहते. ग्लिसरीनयुक्त साबणाचा वापर करू नका.

▮तांदळाच्या पिठीमध्ये पुदिन्याचा अर्क किंवा गुलाबजल मिसळून चेहऱ्यावर दहा मिनिटे हा पॅक ठेव-ावा. दहा मिनिटांनंतर हलक्या हाताने चोळून पॅक काढून टाकावा.


▮पर्समध्ये नेहमी गुलाब अथवा लॅव्हेंडर बेस असलेलं स्किन टॉनिक ठेवा. त्याबरोबर वेट टिश्यूजही हवेत. दर दोन तासांनी यानं चेहरा स्वच्छ केल्यास त्वचा टवटवीत राहते.

▮ तेलकट त्वचेवर अँकनेचा त्रास होत असेल तर टी ट्री अँटी पिंपल जेल अथवा जेल मॉईश्चरायझर वापरणं चांगलं.

▮त्वचेचं सीबम ऑईल नियंत्रणात ठेवण्यासाठी तेलकट आणि मसालेदार पदार्थ वर्ज्य केलेले चांगले. तैलीय ग्रंथीमध्ये संतुलन राखण्यासाठी फायबरयुक्त भोजन उपयुक्त आहे. दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणात एकेक डिश सॅलड असणं अतिआवश्यक आहे.



## तांदळाचे हे आहेत अनेक फायदे



**चेहऱ्यावरील डाग दूर होतात :** चेहऱ्यावरील डाग घालवण्यासाठी उपयोगी आहे तांदूळ. तांदूळ बारीक वाटून घ्या. वाटलेल्या तांदळाच्या पिठामध्ये थोडेसे पाणी मिसळून ही पेस्ट चेहऱ्यावर हलक्या हाताने लावा. यामुळे चेहऱ्यावरील डाग दूर होतात.

**डोकेदुखीसाठी फायदेशीर :** डोकेदुखीचा त्रास होत असल्यास शिजलेल्या भाताच्या पाण्यात एक चिमूट सुंठ पावडर मिसळून डोक्यावर लावा. यामुळे डोकेदुखीपासून सुटका होते.

**जुलाबाचा त्रास होतो दूर :** जुलाबाचा त्रास होत असल्यास तांदूळ बारीक वाटून घेऊन ते पाण्यात उकळवा. यात मीठ टाकून ही पेज प्या. यामुळे जुलाबाचा त्रास कमी होतो.

**सतत तहान लागणे :** सतत तहान लागत असेल तर तांदळाचे दाणे दिवसातून दोन-तीन वेळा चावून चावून खा. यामुळे तहान लागणे कमी होते.

**प्रत्येक व्यक्तीने आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. चांगल्या आरोग्यासाठी रोजचा आहार आपण काय घ्यावा? याची प्रत्येकाला माहिती असायला पाहिजे. तर निरोगी राहण्यासाठी हे १० पदार्थ कच्चे खाऊ नका.**

## हे १० पदार्थ कच्चे खाऊ नका

▮**राजमा :** शिजवलेला राजमा खाल्ल्याने पोटाच्या समस्या दूर होतात.

▮**काजू :** कच्चे काजू पेक्षा भाजलेले काजू चवदार आणि आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

▮**मांस :** मांस नेहमी स्वच्छ धुवून शिजवून खाणे आरोग्यासाठी योग्य आहे.

▮**टोमॅटो :** टोमॅटो कच्चे न खाता थोडेसे शिजवून खावेत. त्याने आरोग्यावर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.

▮**मूग :** मोड आलेले मूग शिजवून किंवा थोडेसे तेल टाकून भाजून खावेत. कच्चे मूग खाल्ल्याने शरीरातील रोग प्रतिकारक क्षमता कमी होते.

▮**हिरव्या भाज्या :** सगळ्या हिरव्या भाज्या नेहमी स्वच्छ धुवून शिजवाव्यात किंवा थोड्याशा तेलात भाजून घेतल्याने शारीरिक समस्या होत नाहीत.

▮**मशरूम :** कच्चे मशरूम शरीरासाठी धोकादायक असतात, त्यासाठी मशरूम नेहमी शिजवून घ्यावेत.

▮**बदाम :** कच्च्या बदामापेक्षा भाजलेले बदाम खाण्यासाठी जास्त चवदार असतात.

▮**दूध :** उकळलेलं दूध शरीरासाठी पौष्टिक असते.

▮**अंडी :** चांगल्या आरोग्यासाठी अंडी उकडून खावीत.



## ॲसिडिटीचा त्रास टाळता येईल का?

कामाच्या आणि जेवणाच्याही अनियमित वेळा, धावपळीचे दैनंदिन आयुष्य, बदलती जीवनशैली, जेवणाच्या अनियमित वेळा, जागरण, बदललेले आहाराचे स्वरूप यामुळे अपचन किंवा ॲसिडिटीचा त्रास होणे हा अनेकांच्या दिनक्रमाचाच भाग बनला आहे. आम्लपित्त किंवा हायपर ॲसिडिटी होऊन छातीत जळजळणं हा सध्याच्या धावपळीच्या जीवनात जवळजवळ प्रत्येकाला छळणारा विकार असतो. अनेकदा रुग्ण 'ॲसिडिटी होतेय' हीच तक्रार घेऊन डॉक्टरकडे येतात.

पण या तक्रारीत खास ॲसिडिटीचा त्रास आहे की दुसरे काही आहे हे डॉक्टरला शोधून काढावे लागते. आपल्या आजूबाजूच्या अनेकांना हा त्रास होत असतो. छातीतील जळजळ प्रत्येकाने कधी ना कधी तरी अनुभवलेली असतेच असते, तर काही व्यक्तींची ती कायम सोबती असते. आपल्या आजूबाजूला कुटुंबात, शेजारीपाजारी अनेक जण यामुळे त्रस्त असतात. कुणाला जळजळतं, तर कुणाला मळमळतं, कुणाचे यामुळे डोके दुखते तर कुणाचे पोट दुखत असते. कधी खूप ढेकर येतात किंवा तोंडामध्ये कडवटपणा येतो. जळजळ होण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख कारण म्हणजे ॲसिडिटी किंवा आम्लपित्त. त्यामुळे ॲसिडिटी म्हणजे काय, हा त्रास कुणाला व का होतो, त्यावर इलाज काय, हा त्रास टाळता येईल का, याबद्दल आपण जाणून घेऊ.



ॲसिडिटी म्हणजे नेमके काय?

आपल्या पोटात म्हणजे जठरात एक पाचक रस तयार होत असतो. तो ॲसिडिक म्हणजे आम्लयुक्त असतो. आपण जेवलेल्या अन्नाच्या पचनासाठी या पाचक रसाची अत्यंत गरज असते, पण योग्य प्रमाणात. हाच पाचक रस जर जास्त प्रमाणात निर्माण झाला किंवा अवेळी (म्हणजे जेवणाच्या वेळेव्यतिरिक्त) तयार झाला तर आम्लपित्ताचा त्रास होतो. यालाच ॲसिडिटी असे म्हणतात.

### 'ॲसिडिटी' का होते?

■ पोटात जास्त प्रमाणात आणि अवेळी हा 'आम्लयुक्त पाचकरस' तयार होण्याची महत्त्वाची कारणे म्हणजे worry, hurry, curry. आयुष्य हल्ली वेगवान झाले आहे.

■ सकाळी न्याहरी करण्यासाठी वेळ नसतो. मग नुसताच चहा, कॉफी इ. पेये घेतली जातात. ज्यामुळे पोटातील ॲसिड किंवा आम्लपित्त वाढते व ॲसिडिटी जाणवू लागते.

■ धकाधकीच्या जीवनात प्रत्येक जण विविध मानसिक ताणाखाली वावरत आहे. अभ्यास, करिअर, कार्यालयातील कामाचा तणाव, कौटुंबिक ताणतणाव इत्यादी कारणांमुळे मज्जासंस्थेवर परिणाम होत असतो आणि त्यामुळे जठररसाची निर्मिती जास्त प्रमाणात होत राहते. ॲसिडिटीची सुरुवात होते.

■ भूक लागली की रस्त्यात उभे राहून वडापाव, पावभाजी, पिझ्झा, पाणीपुरी, दाबेली इत्यादी फास्टफूड खाण्याकडे कल वाढत आहे. यातून अमिबीयासिस किंवा जियारडिआसिस सारखे संसर्ग होतात आणि यामुळे देखील ॲसिडिटी (gastritis) चा त्रास होतो.

### प्रमुख कारणे

▮रात्री भरपेट जेवून तत्काळ झोपणे.

▮रात्री खूप उशिरा झोपणे.

▮बदलीच्या नोकऱ्यांमुळे पुरेशी झोप न होणे. अपुऱ्या झोपेमुळेही ॲसिडिटी बळावते.

▮मद्यपान करणे.

▮अंगदुखी, सांधेदुखी, डोकेदुखी इत्यादी कारणांसाठी वेदनाशामक औषधे सातत्याने घेणे.

▮आहारात अतितेलकट, तिखट, जळजळीत मसाल्याचे पदार्थ घेतल्यानेही ॲसिडिटी वाढते.

▮अतिकडक उपवास किंवा उपवासाच्या पदार्थांच्या सेवनानेही ॲसिडिटीचा त्रास होतो.

▮शिळे अन्न खाल्ल्याने पोटातले आम्लपित्त वाढते आणि अपचन झाल्याने ढेकर येतात.

▮भुकेपेक्षा दोन घास कमी खावेत हा आयुर्वेदाने सांगितलेला मूलमंत्र लक्षात ठेवावा. भुकेपेक्षा अधिक खाल्ल्यानेही आम्लपित्त वाढते आणि आंबट ढेकर येतात.

### लक्षणे

▮जळजळ, आम्लपित्त पोटाच्या वरच्या भागात किंवा छातीत जळजळ होणे ही ॲसिडिटीची मुख्य लक्षणे आहेत. काहीही तिखट किंवा तेलकट जास्त खाल्ल्यास जळजळ होते. जेव्हा जठरात किंवा आतड्यात व्रण (अल्सर) असतो, तेव्हा प्रभावी उपाययोजना करून जळजळ नाहीशी होते. जर व्रण नसेल तर त्याला वैद्यकीय भाषेत नॉन अल्सर डीस्पेप्सिया म्हणतात. म्हणजे लक्षणे तर अल्सरची आहेत, पण एण्डोस्कोपी केल्यास अल्सर नाही. अशा रुग्णांना वारंवार हा त्रास सतावतो.

▮काही वेळा जेवताना किंवा जेवणानंतर जठरातील आम्ल घशात येऊन, अन्ननलिकेत जखमा होतात.

▮जठरात विशिष्ट जंतूंचा संसर्ग झाल्यास ॲसिडिटी बळावते आणि अल्सर किंवा काही गाठीसुद्धा येण्याचा संभव असतो.

▮हृदयविकाराचा झटका, पित्ताशयातील खडे, पित्ताशयाची सूज, स्वादुपिंड दाह इत्यादी अनेक कारणे असण्याची शक्यता असते. या दुखण्याकडे वेळीच लक्ष न दिल्यास धोकादायक ठरू शकते.

## मी पुन्हा तिथे काम करणार नाही... निलेश साबळेने 'चला हवा येऊ द्या'चा विषयच संपवला




मुंबई- आपल्या विनोदी लेखनाने आणि जबरदस्त टायमिंगच्या जोरावर प्रेक्षकांची वाहवा मिळवणारा लोकप्रिय अभिनेता, दिग्दर्शक, लेखक निलेश साबळे याचा स्वतःचा असा चाहतावर्ग आहे. त्याच्या 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमाने प्रेक्षकांचा नुकताच निरोप घेतला. गेली १० वर्ष हा कार्यक्रम प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. हा कार्यक्रम बंद झाल्यानंतर निलेश आता कलर्स मराठीवर झळकणार आहे. तो भाऊ कदम आणि ओंकार भोजने यांच्या सोबत 'हसताय ना? हसायलाच पाहिजे' या कार्यक्रमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मात्र नुकतंच त्याला पुन्हा 'चला हवा येऊ द्या'मध्ये परतण्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्याने स्पष्ट नकार दिला आहे. असं तो नेमकं काय म्हणाला.

'चला हवा येऊ द्या'ने जरी आता प्रेक्षकांचा निरोप घेतला असला तरी तो पुन्हा ऑगस्टमध्ये परतणार असल्याचं बोललं जातंय. मग तेव्हा तू या कार्यक्रमाचा भाग असणार का? या प्रश्नावर निलेशने मोठं विधान केलं आहे. निलेशने नुकतीच एबीपी माझाला मुलाखत दिली. या मुलाखतीत बोलताना त्याने आपण आता पुन्हा त्या कार्यक्रमात काम करणार नसल्याचं सांगितलं आहे. याबद्दल बोलताना निलेश म्हणाला, 'जर चला हवा येऊ द्या कार्यक्रम परत सुरु झाला, तर मी त्यात काम करणार नाही. कारण जेव्हा आपण एखादी गोष्टी वारंवार करतो, तेव्हा त्याचा कंटाळा येतो. म्हणजे जर 'बाहुबली' चित्रपटाचा पहिला पार्ट आला तर प्रेक्षक त्यावर प्रेम करतील, दुसऱ्यावर करतील पण तिसऱ्या भागाला कदाचित प्रेक्षक कंटाळून जातील. त्यामुळे पुन्हा पुन्हा त्याच भूमिकेत दिसलो तर प्रेक्षकही कंटाळतील. त्यामुळे मी पुन्हा 'चला हवा येऊ द्या' करणार नाही.'

निलेश पुढे म्हणाला, 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमाबद्दल आम्हाला चॅनलकडून सांगण्यात आलं होतं की, ''जानेवारीमध्ये कार्यक्रम बंद करुन तो ऑगस्टमध्ये पुन्हा सुरु करायचा. पण आता तो सुरु होणार की नाही, याबद्दल मला कोणतीही कल्पना नाही.'' सध्या निलेश साबळे हा ''हसताय ना? हसायलाच पाहिजे'' या कलर्स मराठी वाहिनीवरील कार्यक्रमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मात्र हा कार्यक्रम 'चला हवा येऊ द्या' सारखाच असल्याने निलेशचं झी मराठीशी काहीतरी बिनसलं असल्याच्या चर्चा आहेत.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ६२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | 1 | | | 7 | | 9 | 2 |
| | | 2 | 1 | | | | | |
| 5 | | 7 | | | 3 | | 8 | 4 |
| | | 4 | 3 | | | | | 6 |
| | 1 | | | 8 | 9 | | | |
| 2 | 3 | | | 1 | | 7 | | |
| 4 | | 8 | | | | 6 | | |
| | | | 2 | | 6 | | 3 | 9 |
| 6 | 2 | | 8 | | 5 | | 7 | |

### उत्तर सुडोकू -६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 7 | 1 | 9 | 2 | 5 | 3 | 4 | 8 |
| 8 | 2 | 3 | 7 | 1 | 4 | 9 | 5 | 6 |
| 4 | 5 | 9 | 8 | 3 | 6 | 1 | 7 | 2 |
| 2 | 6 | 4 | 3 | 5 | 9 | 7 | 8 | 1 |
| 7 | 3 | 8 | 2 | 6 | 1 | 4 | 9 | 5 |
| 1 | 9 | 5 | 4 | 7 | 8 | 6 | 2 | 3 |
| 3 | 1 | 2 | 5 | 4 | 7 | 8 | 6 | 9 |
| 5 | 8 | 7 | 6 | 9 | 3 | 2 | 1 | 4 |
| 9 | 4 | 6 | 1 | 8 | 2 | 5 | 3 | 7 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## या अभिनेत्रीला अभिनेत्री नाही तर डॉक्टर बनायचं होतं!

फिल्म इंडस्ट्रीमध्ये फार कमी स्टार्स आहेत ज्यांना त्यांच्या पहिल्याच चित्रपटातून प्रसिद्धी मिळाली. खरे तर सिनेविश्वात नाव आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. आज आम्ही तुम्हाला एक अशा अभिनेत्रीबद्दल सांगणार आहोत जिने २०१५ मध्ये साऊथ फिल्म इंडस्ट्रीत पदार्पण केले होते पण गेल्या ९ वर्षात ती इतकी लोकप्रिय झाली आहे की चाहते तिच्या चित्रपटांची आतुरतेने वाट पाहत असतात. ही अभिनेत्री दुसरी कोणी नसून साऊथ फिल्म इंडस्ट्रीची सुपरस्टार साई पल्लवी आहे. साई पल्लवी ही साऊथची अतिशय लोकप्रिय अभिनेत्री. आपल्या साधेपणामुळे ती प्रेक्षकांना इतर अभिनेत्रींपेक्षा जास्त जवळची वाटते साईने सध्याच्या कारकिर्दीत मुख्यतः तामिळ, तेलुगू आणि मल्याळम चित्रपटांमध्ये काम केले आहे. चित्रपटसृष्टीत येण्यासाठी विविध प्रकारच्या सर्जरी किंवा काही उपचार घेणाऱ्या अभिनेत्री आजुबाजूला असताना मेकअप न करता साई पल्लवीने आपली वेगळी ओळख निर्माण केली.

**साई पल्लवीचं वैद्यकीय शिक्षण**

साई पल्लवी आज सिनेसृष्टीतील टॉपच्या अभिनेत्रींपैकी एक असली, तरी तिला अभिनेत्री नाही तर डॉक्टर बनायचं होतं. साई पल्लवीकडे मेडिकलची डिग्रीदेखील आहे. अभिनेत्री जर अभिनय क्षेत्रात आली नसती, तर एक कार्डियोलॉजिस्ट असती. २०१४ मध्ये ज्यावेळी ती शिक्षण घेत होती, त्यावेळी तिला प्रेमम सिनेमातील मलार या भूमिकेची ऑफर आली होती. या सिनेमातील भूमिकेसाठी तिला साउथचा फिल्मफेयर अवॉर्डदेखील मिळाला होता.



**२ कोटींची जाहिरात नाकारली**

साई पल्लवी तिच्या चेहऱ्यावर कधीही कॉस्मेटिक उत्पादने वापरत नाही, तिचे सौंदर्य नैसर्गिक आहे. सई पल्लवीने २ कोटी रुपयांच्या फेअरनेस क्रीमच्या जाहिरातीची ऑफर नाकारली होती. म्हणाली की, अशा जाहिराती लोकांमध्ये आणि विशेषतः महिलांना चुकीचा संदेश देतात. त्यामुळेच ती अशा कोणत्याही मोहिमेचा भाग होऊ इच्छित नाही. साई पल्लवीच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक झाले होते.

## दिनविशेष

### २१ एप्रिल

- ७५३: रोम्युलस यांनी रोम स्थापन केले. (पारंपारिक तारीख)
- १५२६: मुघल साम्राज्याचे शासक सम्राट अकबर व सुलतान इब्राहिम लोदी यांच्यात पानिपतचे पहिले युद्ध होऊन त्यांत सुलतान इब्राहिम लोदी यांच्या पराभवानंतर दिल्ली येथील सुलतान शाहीचा अंत झाला.
- १६६९: छत्रपती शिवाजी महाराज यांनी समर्थ रामदास स्वामी यांची भेट घेतली.
- १७२०: पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट्ट यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र थोरले बाजीराव पेशवे हे मराठा साम्राज्याचे उत्तराधिकारी बनले
- १९३२: नाशिकच्या काळाराम मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी खुले ठेवण्याचा आदेश देण्यात आला.
- १९४१: दुसऱ्या महायुद्धा दरम्यान ग्रीस देश जर्मनी देशाला शरण गेला.
- १९६०: रिओ दि जानेरो ह्या ब्राझील देशाच्या राजधानी चे उद्घाटन झाले.
- १९७२: 'अपोलो १६' या अमेरिकन अंतराळयानातुन गेलेले जॉन यंग आणि चार्ल्स ड्युक हे अंतराळवीर चंद्रावर उतरले.
- १९९६: भारतीय वायू सेनेचे अधिकारी संजय थापर पॅराशूट च्या साह्याने उत्तर ध्रुवावर उतरले.
- १९९७: भारताचे १२ वे पंतप्रधान म्हणून डॉ. इंद्रकुमार गुजराल (वय ७८ वर्षे) यांनी सूत्रे हाती घेतली. गुजराल हे वयाने ज्येष्ठ असलेले दुर्सया क्रमांकाचे पंतप्रधान आहेत. याआधी मोरारजी देसाई यांनी ८१ व्या वर्षी पंतप्रधानपदाची सूत्र हाती घेतली होती.
- २०००: आई वडिलांच्या संपत्तीत परावलंबी विधवेलाही अधिकार असल्याचा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला.
- २००७: वेस्ट इंडीज देशातील क्रिकेट संघाचे महान क्रिकेटपटू ब्रायन लारा यांनी एकदिवसीय क्रिकेट खेळातून निवृत्ती घेतली.
- १८६४: मॅक्स वेबर - जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ (मृत्यू: १४ जून १९२०)
- १९०९: ज.द. गोंधळेकर (जनार्दन दत्तात्रय गोंधळेकर), मराठी चित्रकार.
- १९२२: ॲलिएस्टर मॅकलिन - स्कॉटिश साहसकथा लेखक (मृत्यू: २ फेब्रुवारी १९८७)
- १९२६: एलिझाबेथ (दुसरी) - इंग्लंडची राणी. प्रदीर्घ कारकिर्दीच्या बाबतीत राणी व्हिक्टोरिया खालोखाल राणी एलिझाबेथचा दुसरा क्रमांक लागतो.
- १९३४: डॉ. गुंथर सोन्थायमर - महाराष्ट्र लोकधर्म व मराठी संस्कृतीचे जर्मन अभ्यासक
- १९४५: भारतीय क्रिकेटपटू आणि अंपायर श्रीनिवासराघवन वेंकटराघवन यांचा जन्म.
- १९५०: शिवाजी साटम - अभिनेते
- १९५०: भारतातील प्राख्यात किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे गायक पंडित उपेंद्र भट यांचा जन्मदिन.
- १५०९: हेन्री (सातवा) - इंग्लंडचा राजा (जन्म: २८ जानेवारी १४५७)
- १९१०: मार्क ट्वेन - विख्यात अमेरिकन विनोदकार आणि कादंबरीकार (जन्म: ३० नोव्हेंबर १८३५)
- १९३८: कवी सर मुहम्मद इकबाल.
- १९३८: सर मुहम्मद इक्बाल - पाकिस्तानी कवी, तत्त्वज्ञ आणि राजकीय नेते (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७)

## भविष्य

**मेष** असुरक्षितता अथवा आत्मविस्मृतीच्या भावनेमुळे चक्कर येईल. तुमच्या नियमित कष्टांचे आज चांगल चीज होईल.

**वृषभ** विश्रांती घ्या आणि कामात व्यग्र असताना मधेमधे थोडा आराम करा. वाईट सवयी तुम्हाला जडविण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहा.

**मिथुन** चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. तुमच्या पालकांसोबत तुमचा आनंद वाटा.

**कर्क** तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. मित्रांच्या मदतीमुळे आर्थिक अडचण सुकर होईल.

**सिंह** तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते. किरकोळ आणि ठोक व्यापाऱ्यांसाठी चांगला दिवस.

**कन्या** अलिकडे घडलेल्या घटनांमुळे तुमचे चित्त विचलित होईल. ध्यानधारणा आणि योगासने यामुळे तुम्हाला शारीरिक व अध्यात्मिक फायदा होईल. आज कार्य क्षेत्रात तुमच्या कुणी जुन्या कामाचे कौतुक होऊ शकते.

**तुला** भावनिकदृष्ट्या तुम्ही स्थिर व्यक्ती नाही आहात, त्यामुळे इतरांसमोर कसे वागता बोलता त्याबाबत सावध असणे योग्य ठरेल. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल.

**वृश्चिक** विनाकारण स्वतःची निंदा करून तुमचा उत्साह घालवू नका. दिवसाच्या उत्तरार्धात आराम करा. कामातील दबावामुळे मानसिक खळबळ आणि अशांती वाढेल.

**धनु** आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. तुम्हाला जिथे बोलण्याची गरज नाही तिथे तुम्ही बोलू नका. जबरदस्ती बोलण्याच्या कारणाने तुम्ही स्वतःला चिंतेत टाकू शकतात.

**मकर** तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकते. तुमचे हसतमुख वागणे कुटुंब जीवन प्रकाशमान करतील. शक्य असेल तर लांबचा प्रवास टाळणे चांगले.

**कुंभ** तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. तुम्हाला एकाकी वाटेल तेव्हा तुम्ही तुमच्या कुटुंबियांची मदत घ्या. त्यामुळे नैराश्यापासून तुमचा बचाव होईल. परिणामी सुयोग्य, संयुक्तिक निर्णय घेण्यास तुम्हाला मदत होईल.

**मीन** आजवर दबून राहीलेले सुप्त प्रश्न उभे राहील्यामुळे मानसिक तणाव येऊ शकतो. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल. कुटुंबाच्या कल्याणासाठी मेहनत करा.


Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# जागावाटपाचा तंटा आणि पहिली घंटा!

भारतीय लोकशाहीच्या सार्वत्रिक उत्सवाची शुक्रवारी पहिली घंटा वाजली. केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या, उमेदवारांनी आपापल्या मतदारसंघात निवडणूक लढवण्यासाठी अर्ज भरले, त्यातल्या काहींनी मागेही घेतले. प्रचारसभांचा धुरळा उडाला आणि सरतेअखेरीस लोकशाही टिकवून ठेवण्याची जबाबदारी असणाऱ्या मतदारांनी शुक्रवारी पहिल्या टप्प्यांतर्गत मतदान करत उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रांमध्ये बंदिस्त केले. ४ जून रोजी जेव्हा मतमोजणी होईल, तेव्हा या उत्सवात कुणाचा झेंडा पुढची ५ वर्षे संसदेवर फडकेल हे समजेल. १८व्या लोकसभेच्या निवडणुका जाहीर होऊन निवडणूक प्रक्रिया सुरू होण्यास यंदा बराच उशीर झाला. यावेळी देशभरात तब्बल ७ टप्प्यात मतदान होणार आहे. आता कुठे पहिल्या टप्प्यातील मतदान झाले. अजून ६ टप्पे पार पडायचे आहेत. ४ जूनपर्यंतचा हा उत्कंठावर्धक प्रवास असणार आहे. पहिल्या टप्प्यात अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, राजस्थान, सिक्कीम, तामिळनाडू, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, अंदमान निकोबार, जम्मू आणि काश्मीर, लक्षद्वीप आणि पुद्दुचेरी अशा सर्वाधिक १०२ मतदारसंघांसाठी मतदान झाले. महाराष्ट्राच्या पूर्व विदर्भातील रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर मतदारसंघांचा यात समावेश होता. यानंतर पुढच्या अर्थात दुसऱ्या टप्प्यातील ८८ जागांसाठी २६ एप्रिलला मतदान होईल. पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी तिसरी घंटा वाजण्याआधीच महाराष्ट्रातील महायुती आणि महाआघाडीच्या रेंगाळलेल्या काही जागांवरील संभ्रम दूर झाला हे मतदारांच्या दृष्टीने बरे झाले. यामध्ये तिसऱ्या आणि पाचव्या टप्प्यातील जागांचा प्रामुख्याने समावेश आहे. यातील सर्वात पहिली जागा आहे ती रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघाची. या जागेवर गुरुवारी भाजपकडून केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना उमेदवारी जाहीर झाली. तसे पाहायला गेल्यास या जागेवर शिवसेनेचे (ठाकरे गट) विनायक राऊत हे विद्यमान खासदार आहेत. त्यामुळे जागावाटपाच्या सूत्रानुसार ही जागा महायुतीतील शिवसेनेच्या (शिंदे गट) वाट्याला जायला हरकत नव्हती. शिवसेनेचे आमदार आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत या जागेवरून निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. त्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. आधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन या जागेवर आपली दावेदारी सांगितली. यानंतर ते थेट नागपूरमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला गेले. या भेटीत कुणी, कुणाला काय आश्वासन दिले हे नेमके सांगता येणार नाही, परंतु हे सारे प्रयत्न तोकडे पडले. एकीकडे भाजपच्या यादीत नारायण राणे यांचे नाव झळकले आणि दुसरीकडे किरण सामंत यांना विधान परिषदेवर पाठवण्याच्या चर्चा सुरू झाल्या. शिवसेनेच्या हातून ही जागा भाजपने खेचून घेतली हेच खरे. तिसऱ्या टप्प्यात येणाऱ्या सांगली लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनीही शुक्रवारी आपला उमेदवारी अर्ज भरला. काँग्रेसचा या जागेवर दावा होता. काँग्रेसचे स्थानिक नेते आणि दिवंगत मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे नातू विशाल पाटील या जागेवरून काँग्रेसच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याच्या तयारीत होते, परंतु कोल्हापूरची हक्काची जागा छत्रपती शाहू महाराजांसाठी कुठलीही खळखळ न करता सोडल्याचा दावा करीत ठाकरे गटाने सांगलीसाठी परस्पर उमेदवार घोषित केला. यामुळे काँग्रेस आणि ठाकरे गटात बरीच ताणाताणी झाली. काँग्रेसच्या नेत्यांनी हायकमांड दरबारी आपली व्यथा मांडूनही उपयोग झाला नाही. अखेर विशाल पाटील यांनी बंडखोरी करीत येथे अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला आहे. ठाकरे गटाच्या तुलनेत येथे काँग्रेसचे संघटन खूपच मजबूत आहे. त्यामुळे विशाल पाटील काँग्रेसची मते फोडण्यात यशस्वी झाले तर ना मला...ना तुला... अशी अवस्था दोन्ही उमेदवारांची होऊ शकते. या मत विभागणीचा फायदा भाजपचे संजयकाका पाटील यांना होऊ शकतो, अशी चर्चा आहे. त्यामुळेच पश्चिम महाराष्ट्रात एखादी तरी जागा हवी असा हट्ट धरून बसण्यापेक्षा ठाकरे गटाने सांगलीच्या जागेऐवजी उत्तर मुंबईची जागा घ्यावी, असा एक प्रस्ताव काँग्रेसकडून ठाकरे गटाला देण्यात आल्याचे समजते. हा प्रस्ताव किती खरा, किती खोटा हे सांगणे अवघड असले तरी सुज्ञास सांगणे न लगे... एवढे जरी ठाकरे गटाला समजले तरी पुरे. नाशिकच्या जागेचा तिढाही सुटल्यात जमा आहे. नाशिकची जागा शिवसेनेच्या वाट्याची असूनही या जागेवर कधी भाजप, कधी राष्ट्रवादी, तर कधी मनसेच्या उमेदवाराची चर्चा रंगली होती. त्यामुळे ही जागा शिवसेनेला गमवावी लागतेय की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी तर माझी उमेदवारी दिल्लीतून पक्की झाल्याचा दावाही केला होता, पण भाजपच्या अंतर्गत सर्वेक्षणाने या दाव्यावर पाणी फेरले. छगन भुजबळांनी शुक्रवारी सकाळी पत्रकार परिषद घेत निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेत असल्याची घोषणा करताच शिवसेनेचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांच्या घशात अडकलेला घास खाली उतरला असेल. दुसऱ्या टप्प्यातील मतदानाचा दिवस उजाडण्याच्या आत महाविकास आघाडी आणि महायुतीतील उरलेल्या जागांचा तिढाही मार्गी लागलेला असेल. त्यामुळे गोंधळात सापडलेल्या मतदारांना निर्णय घेणे तेवढेच सोपे जाईल.

# उद्योजकीय गरजा आणि अभ्यासक्रम



कोणताही अभ्यासक्रम यशस्वी व्हायचा असेल, त्याची उपयुक्तता सिद्ध व्हायची असेल, तर तो कालसुसंगत आणि उद्योजकीय गरजांची पूर्तता करणाराच पाहिजे. नेमके त्याकडेच अभ्यासक्रम बनवताना दुर्लक्ष होते आहे.

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण चर्चेत आल्यापासून अन्ततपूर्वी देखील एक विषय सारखा चर्चेत असतो. आपले शाळा, महाविद्यालयातील अभ्यासक्रम कालबाह्य झाले आहेत. नोकरी देणारे उद्योजक तक्रार करतात की, आजचे पदवीधर नोकरीतल्या, उद्योगातल्या आजच्या गरजांसाठी उपयुक्त नाहीत. त्यांना नीट प्रशिक्षण मिळत नाही. आजकाल महाविद्यालय, विद्यापीठाचा दर्जा ठरविताना गुणवत्तेचा एक निकष किती विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाले, किती वार्षिक पॅकेज मिळाले, यावरून ठरतो. हा निकष योग्य आहे का? विद्यार्थ्यांना चांगली नोकरी मिळवून देणे ही विद्यापीठाची जबाबदारी आहे का? आपले अभ्यासक्रम उद्योजकांना विचारून ठरवायचे का? हा खरा प्रश्न आहे. आपण हे योग्य आहे असे गृहीत धरले, तर आपण नेमक्या कोणत्या उद्योगासाठी पूरक शिक्षण घेतलेले (रेडिमेड) विद्यार्थी तयार करणे अपेक्षित आहे? वेगाने बदलणाऱ्या विज्ञान-तंत्रज्ञानमुळे उद्योग, सेवा क्षेत्र, कामाचे म्हणजे नोकरीचे स्वरूप आरपार बदलले आहे. ते बदलतच आहे. त्या वेगाने वरचेवर अभ्यासक्रम बदलणे, म्हणजेच परीक्षेचे स्वरूप बदलणे शक्य तरी आहे का?

आज अवती-भवतीच्या उद्योग क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता, त्यातील वैविध्य लक्षात घेता अभ्यासक्रम नेमका कोणत्या उद्योगाला पूरक ठरवायचा? टीसीएस, इन्फोसिस, गुगल, फेसबुक, एल अँड टी, डीआरडीओ, इस्रो, खासगी बँका, विमाकंपन्या, वित्तकंपन्या किंवा मार्केटिंग कंपन्या इत्यादी. या सर्वांच्या कामाचे स्वरूप सर्वथा भिन्न आहे. मग अभ्यासक्रम कोणाला अनुरूप ठरेल असा तयार करायचा? दुसरे असे की, कोणती नोकरी स्वीकारायची याचे पूर्ण स्वातंत्र्य विद्यार्थ्याला आहे. ते महाविद्यालय किंवा विद्यापीठ ठरवत नाही. आपल्या असे लक्षात येईल की, ९० टक्के विद्यार्थी त्यांना जे शिकवले त्याचा शिक्षणेतर आयुष्यात मुळीच प्रत्यक्ष उपयोग करीत नाहीत. देशातल्या नाणावलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी म्हणजेच ह्यआयआयटीह्लतून केमिकल इंजिनियरिंगची पदवी घेतलेला विद्यार्थी संगणक क्षेत्रात काम करतो. मोठ्या कंपन्यांच्या उभारणीमध्ये योगदान देतो. अन् शेवटी हे सारे सोडून मराठीत मोठमोठे सुलभ ग्रंथ लिहितो! चेतन भगत मेकॅनिकल इंजिनिअर. पण त्याने काम केले ते परदेशी बँकेत. नंतर चक्क कादंबरी, चित्रपटलेखनाचे क्षेत्र निवडले.

'आयआयटी'तून शिक्षण घेतलेलेच काही विद्यार्थी चक्क आध्यात्मिक गुरू, व्यक्तिमत्व विकासाचे मार्गदर्शक झाले आहेत. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. महाविद्यालय सोडताच नोकरीत, व्यवहारात आपण जे काही ज्ञान, विज्ञान वापरतो ते सारे अभ्यासक्रमाबाहेरचे असते. मग उद्योगाच्या गरजा ओळखून अभ्यासक्रम तयार करा, हा अट्टाहास कशासाठी?

कोणत्याही विषयाचा अभ्यासक्रम सर्वंकष असावा लागतो. त्या-त्या विषयाबाबतच्या मूलभूत संकल्पना, त्याची व्यावहारिक उपयोगिता म्हणजेच ॲपलिकेशन, व्यावहारिक उदाहरण, समस्यांचे आकलन, विश्लेषण, मिळून काम करण्याचे धोरण, नैतिक मूल्यांचे महत्त्व, स्वतंत्र, तार्किक विचार करण्याची पद्धत, क्षमता हे सारे शिकवायचे असते.

प्रत्येक प्रश्नाचे एकच एक ठोकळेबाज उत्तर या भ्रमातून बाहेर पडून, एकापेक्षा जास्त उत्तरांची संभाव्यता तपासायची असते. त्या अनेक उत्तरातून सर्व दृष्टीने उत्तम, कमी खर्चिक, सोपे उत्तर कोणते, हा शोध व्यवहारात जास्त महत्त्वाचा असतो. सातत्याने होणाऱ्या बदलांचा सामना करणे, ते बदल स्वीकारून, समजून, त्यानुसार आवश्यक नवे ज्ञान संपादन करणे (learning as well as unlearning) हे सारे गरजेचे असते. जेव्हा उद्योजक म्हणतात की, तुमचे अभ्यासक्रम कालबाह्य आहेत, तेव्हा त्यांना अभ्यासक्रमात, शिकवण्याच्या पद्धतीत बदल अपेक्षित आहेत, हे लक्षात घ्यावे.

### योग्य मूल्यमापन हवे

अभ्यासक्रम तयार करताना काय, किती, कसे, केव्हा शिकवायचे, अन् शिकविले त्याचे उचित मूल्यमापन कसे करायचे यावर जास्त विचार व्हायला हवा. पूर्वी पाढे पाठ असण्याला महत्त्व होते. इतिहासातील सनावळ्यांना महत्त्व होते. गणितात लॉगटेबलचा वापर, त्रिकोणमिती आणि त्याचा वापर करून गणिते सोडवणे, गणितातील इतर संकल्पना समजून घेऊन त्यांचा वापर करणे याला महत्त्व होते. आता त्याच्या पलीकडे अन्य ज्ञानाचीदेखील गरज भासते. समीकरणे सोडवायला संगणक आहेत. हव्या त्या माहितीसाठी इंटरनेट, गुगल आहेच. पूर्वी बँकेत पैसे जमा करणे, पैसे काढणे यासाठी रजिस्टर वापरायचे. आता सॉफ्टवेअर आले आहेत. त्यामुळे हे काम स्वतःचे स्वतः करता येते. एटीएमवर जाऊन पैसे काढता किंवा भरता येतात. त्याशिवायही तेथे इतर सुविधा उपलब्ध आहेत. बऱ्यापैकी व्यवहार ऑनलाईन होताहेत.

आपण पूर्वी जी गणिते सोडवण्यासाठी वेळ घालवीत होतो, ते काम आता संगणक करेल. हा फावला वेळ आपण दुसऱ्या अभ्यासासाठी वापरू शकतो. नवे वाचन करू शकतो. आता फळ्यावर प्रमेये सिद्ध करून दाखवण्याची गरज नाही. जे पुस्तकात आहे, तेच कशाला शिकवायचे? त्या ऐवजी त्या प्रमेयामागची संकल्पना, त्याचा व्यवहारात उपयोग कसा करायचा, हे सोदाहरण समजावून सांगा. ते जास्त फायद्याचे ठरेल.

### स्वातंत्र्य शिक्षकाचे

अभ्यासक्रम हा शिक्षकाने केवळ मार्गदर्शक म्हणून वापरायचा असतो. तो अभ्यासक्रम किती रंजक, उपयोजित पद्धतीने शिकवायचा याचे पूर्ण स्वातंत्र्य शिक्षकाला असते. तथापि, आपण ते वापरत नाही. आपले शिकवणे आगळे वेगळे, 'आऊट ऑफ बॉक्स' व्हायला हवे. हा प्रयत्न प्रत्येक प्राध्यापकाने करायला हवा. त्यासाठी कष्ट घ्यावे लागतात. वेळ द्यावा लागतो. अभ्यासक्रमाच्या बाह्यरचनेपेक्षा शिकविण्याची-शिकण्याची (teaching-learning process) पद्धत जास्त महत्त्वाची.

ती भविष्याचा वेध घेणारी, उद्याच्या गरजा ओळखून त्यानुसार सातत्याने बदलाला सामोरे जाणारी अशी हवी. आपल्या प्रयोगशाळांतून जे विज्ञानाचे प्रयोग शिकवतात ते जुने, वापरण्यात येणारी यंत्रे जुनी. आता अनेक क्षेत्रात स्वयंचलीतीकरण झाले आहे. वैद्यकीय क्षेत्रात आधुनिक दवाखान्यातील यंत्रणा पाहिली की हे लक्षात येते. इंटरनेटमुळे सेवा क्षेत्र पुरते बदलले आहे. हे बदल शिकण्यात, शिकविण्यात म्हणजेच अभ्यासक्रमात प्रतिबिंबित होणे गरजेचे आहे. आपल्याकडील अभ्यासमंडळे, विद्वत परिषदा, सिनेट या प्राधिकरणांचे या महत्त्वपूर्ण बाबींकडे पुरते दुर्लक्ष होते. याचे कारण या सर्व क्षेत्रात प्रचंड प्रमाणात वैचारिक दारिद्र्य आहे. तिथे राजकीय घुसखोरी आहे. तिथला अजेंडा वेगळाच आहे. त्यामुळे रोग एकीकडे उपचार दुसरीकडे अशी अवस्था आहे. विद्यापीठातील संशोधन, पीएच.डी.ची गरज, त्यातून वाढलेला भ्रष्टाचार यामुळे त्या पदवीची निरर्थकता लक्षात येते. त्यातील कमतरता दूर करण्याची गरज आहे. थोडक्यात, अभ्यासक्रमाकडे बघण्याचा सध्याचा दृष्टिकोन आधी बदलण्याची आवश्यकता आहे. त्यातील महत्त्वाचे बदल पूर्णपणे अंमलात कसे येतील, हे पाहायला हवे.

# वीज दरवाढीचे चटके केवळ महाराष्ट्रालाच?

महाराष्ट्र वगळता भारतात सध्याच्या घडीला अनेक राज्यांमध्ये नागरिकांना शेकडो युनिटपर्यंत मोफत वीज मिळत आहे. दिल्ली, झारखंड, कर्नाटक, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये ठराविक युनिटपर्यंत वीज ही नागरिकांसाठी मोफत देण्यात येते. काही ठिकाणी ३०० युनिट्स, काही राज्यांमध्ये २००, तर काही ठिकाणी केवळ१०० ते१२५ युनिट्स इतक्याच प्रमाणात मोफत वीज मिळते, परंतु महाराष्ट्राच्याबाबत बोलायचे झाल्यास येथील नागरिकांना मात्र कधीही असा दिलासा अद्यापपर्यंत मिळालेला नाही. याउलट विजेचे दरही इतर राज्यांच्या तुलनेत चढेच असले तरी ते भरावेच लागतात. त्यामुळेमोफत किंवा सवत नसली तरी महागडे आणि वाढीव वीज दरांची कळ सोसणे महाराष्ट्राच्या नशिबी कायम आहे. देशात केवळ महाराष्ट्रच सध्या वीज दरवाढीचे चटके सहन करत आहे. अशा वेळी महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधी लोकांचा विचार का करत नाहीत, असा प्रश्न पडतो. उन्हाळा ऋतूच्या पार्श्वभूमीवर वातावरणात उष्णतेची वाढ झालेली असतानाच आता वीज दरवाढीचे चटकेही ग्राहकांना सोसावे लागणार असल्याच्या वृत्ताने सर्वसामान्यांना आणखीनच घाम फोडला आहे. २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचा पहिलाच महिना असणाऱ्या एप्रिल महिन्यापासूनच विजेच्या दरांमध्ये सरासरी जवळपास साडेसात टक्के ते १० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय राज्यातील वीज पुरवठादार कंपन्यांनी घेणे म्हणजे ग्राहकांना वातावरणातील उष्णतेसोबतच आर्थिक झळाही सोसाव्या लागणार, यात शंका नाही. वीज दरवाढ होणे, हे काही आता सर्वसामान्यांसाठी नवे राहिलेले नाही. यापूर्वीही ग्राहकांना या ना त्या कारणाने वीज दरवाढीचे चटके सहन करावे लागतातच, मात्र यंदा दरवाढ करण्याचा जो मुहूर्त वीज पुरवठादार कंपन्यांकडून साधण्यात येतो, तो पाहता भरमसाठ वीजबिलाच्या वृद्धीचा शॉक देण्यासाठीच हा घाट घालण्यात आला आहे का, असा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही.

# कल्याण स्टेशन परिसरातील वाहतूक व्यवस्था कोलमडली!

## ढिसाळ नियोजनामुळे सॅटिसचे काम संथ



**कल्याण :** कल्याण स्टेशन परिसरात स्मार्टसिटी अंतर्गत सुरू असलेले सॅटिस प्रकल्पाचे काम ढिसाळ नियोजनामुळे कासवगतीने सुरू आहे. वाहतूक पोलीस, आरटीओ, महापालिका, रेल्वे प्रशासन यांच्यात समन्वय्य नसल्याने शहरातील प्रमुख चौकात दररोज प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा आहे. स्टेशन परिसरात तर वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे चित्र कल्याणकरांना दररोज अनुभवयास येत आहे.


स्मार्ट सिटी अंतर्गत कल्याण स्टेशन परिसर सुधारणा प्रकल्प म्हणजेच सॅटिस उड्डाणपूल उभारण्याचे काम पाच वर्षांपूर्वी सुरू करण्यात आले. मात्र नियोजनाच्या अभावामुळे हे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. या कामासाठी वाहतूक पोलिसांनी परिपत्रक जारी करून वाहतूक व्यवस्थेत बदल केले. मात्र प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी होत नसल्याने वाहतूक व्यवस्थाच कोलमडली आहे. सॅटिसच्या कामामुळे एसटी डेपो विठ्ठलवाडी येथे स्थलांतरित करण्यात आला. त्यामुळे एसटी बसेसची वाहतूक सॅटिसचे काम पूर्ण होईपर्यंत प्रेम ऑटो, दुर्गाडी चौक, एपीएमसी मार्केट मार्गे होणे व शहराच्या बाहेरच तात्पुरते बसथांबे करणे आवश्यक होते. मात्र बसडेपो स्थलांतरित करूनही लांब पल्ल्याच्या सर्व बसेस स्टेशन परिसरात येत असल्याने शहरातील वाहतूक मार्गावर ताण येऊन प्रचंड वाहन कोंडी होत आहे.

एसटी स्टॅण्ड समोरील प्रवाशांची प्रचंड वर्दळ असलेला रेल्वे हद्दीतील ३० वर्ष जुना रिक्षा स्टॅण्ड कोरोना काळात रेल्वेने कायमस्वरूपी बंद केला. रेल्वे आणि पालिकेने पर्यायी रिक्षा स्टॅण्डची व्यवस्था न केल्याने सद्यस्थितीत सर्व रिक्षा रस्त्यावर उभ्या आहेत. काही महिन्यांपुर्वी एसटी स्टॅण्ड समोरील रहदारीचा रस्ताही सॅटिसच्या पुढील कामासाठी बंद करण्यात आला. त्यामुळे तेथील सर्व रिक्षा वाहतूकही साधना हॉटेल येथील वर्दळीच्या रस्त्यावर आली आहे. रिक्षा संघटनेने पर्यायी रिक्षा स्टॅण्डकरीता दोन - तीन ठिकाणी जागा सुचवूनही रेल्वे व पालिका प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यातच भिवंडी, पडघा, शिळरोड व श्रीमलंग परिसरात जाणाऱ्या शेकडो काळीपिवळी ओम्नी टॅक्सी रहदारीचा रस्ता व्यापून उभ्या राहतात.

### रिक्षाचालक-प्रवाशांत रोजचाच संघर्ष

रिक्षाचालक आणि प्रवाशांमध्ये तू तू..मैं मैंचे वाद व भांडणे हे आता रोजचेच झाले आहेत. दोन दिवसांपूर्वीच चारपाच ओम्नी टॅक्सीचालकांनी स्टेशन परिसरात रिक्षाचालकास बेदम मारहाण केली होती. प्रवाशांनीच वेळीच हस्तक्षेप करून त्याला वाचवले. यात गंभीर दुखापत झालेल्या रिक्षाचालकास कल्याण पूर्वेतील जनकल्याण हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात येत आहेत. याप्रकरणी फरार ओम्नीचालकांविरोधात महात्मा फुले पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# CJI Chandrachud Urges Voters Not to Miss Voting in 2024 General Elections



**NEW DELHI**

Chief Justice of India DY Chandrachud has urged citizens not to miss the opportunity to vote in the general elections, saying that it is one of the "foremost duties" in a constitutional democracy. In a video message for the Election Commission's 'My Vote My Voice' mission for the 2024 Lok Sabha polls, Justice Chandrachud said, "We are citizens of the world's largest democracy, which is our country. "The Constitution gives us a multitude of rights as citizens but it also expects that each of us performs the duty, which is cast upon us. And one of the foremost duties of citizenship is to cast a vote in a constitutional democracy," he said. "I will request every one of you please do not miss this opportunity to vote responsibly as citizens of our great motherland. Five minutes, every five years for our nation. It's doable, isn't it? Let's vote with pride. My vote, my voice," the CJI said.

Justice Chandrachud said the citizens have a participatory role in electing the government and that is why it is said that "this government is a government of the people, by the people and for the people". He recalled his excitement as the first time voter and queuing up at the polling booth to exercise the franchise.

"The ink on the finger when I vote allows tremendous feelings of patriotism and association with the nation...," he said. "So our Constitution and our law provides for one citizen, one vote and one value. I think that's the great tenacity and the power of our nation as a constitutional democracy," he said.

The CJI said he never missed that duty to cast his vote when he was a lawyer and had to run around for work. The Lok Sabha elections will be held from April 19 to June 1, 2024 to elect the 543 members of the 18th Lok Sabha.

The elections will be held in seven phases and the results will be announced on June 4. 2024.

# Did Raj Kundra Sell Rs 80 Cr Mumbai Flat to Wife Shilpa Shetty for Rs 38 Cr? 'Tricks' Bizman Used to Evade ED Eyes



**MUMBAI**

Businessman and Shilpy Shetty's husband Raj Kundra reportedly sold his Rs 80-crore Juhu flat to actor-wife for Rs 38 crore in 2022 after the Enforcement Directorate (ED) initiated a probe against him in a money laundering case. A report in Times of India quoted its sources as saying that the probe agency it was an internal arrangement of the couple to avoid the property's attachment and it believes that Kundra is still the flat's real owner. On Thursday, the ED issued a press release stating that the case pertains to alleged duping of investors through the use of crypto currency like Bitcoins. The agency alleged Kundra received 285 Bitcoins from the "mastermind" and promoter of Gain Bitcoin Ponzi "scam", Amit Bhardwaj, for "setting up a Bitcoin mining farm in Ukraine". The businessman's attached properties include a residential flat in Mumbai's Juhu, a bungalow in Pune and equity shares in the name of Kundra. These assets are worth Rs 97.79 crore, the ED said. A lawyer for the couple said no prima facie case has been made out against his clients and that they would cooperate with the authorities. "We have complete faith in the honourable judiciary. I believe when we make our fair representation before the honourable Enforcement Directorate, even the investigation agencies may grant justice to us. "We have faith in the fair investigation," advocate Prashant Patil said in a statement. Day after ED's revelations, Raj Kundra shared a cryptic post on his Instagram stories. "There is a time to be a nice person. And there's time to say enough is enough," his post with a picture and quote read.

# Mango To Litchi, Fruits To Avoid If You Are Diabetic



Diabetes is a serious health issue that can be controlled but not completely cured. Maintaining a healthy diet along with regular workouts can help to maintain the diabetes level, while keeping the body active and strong.

Around 10.1 crore people suffer from diabetes in India. Doctors suggest various methods to reduce the increasing blood sugar level. Fruits are generally considered beneficial for health, but some fruits can increase the blood sugar level, which can highly affect a diabetic patient. A diabetic person is also advised not to drink fruit juice as it contains a high amount of sugar.

Senior Ayurvedic expert Dr Vinay Khuller explained that fruits do provide essential nutrients and fibres that are needed. There are some fruits that can be dangerous for a diabetic patient as they contain high amounts of sugar that can significantly increase the blood sugar level of a diabetic person. The fruits that should be avoided are mangoes, sapota, bananas, pineapples, litchi and grapes. Apples, oranges, guavas, papayas, strawberries, and some fruits that a diabetic patient can consume.

While everyone loves to eat mango, it is advised to avoid it if someone is diabetic. A very small quantity can only be consumed, as the sugar level in the mangoes is generally very high. The high sugar content can rapidly increase the body sugar level which can be fatal for a diabetic patient. Dr Vinay Khuller said, "If a diabetic patient wants to eat mangoes that person can consume just one or two slices but not more than that. It is better to avoid it as the sugar level in the fruit is very high."

Consumption of Bananas should also be limited as they contain a high glycemic index, which drastically can increase the sugar level of a patient. Consumption of bananas should either be avoided or limited. Litchi has the highest sugar content which can rapidly increase blood sugar levels.

